November. 2019 (1)

-भाईंदर महानगरपालिका
विधी विभाग
आवक क्र. 01 मा.अ.
दिनांक: 04/11/19

# केंद्रशासनाचा माहिती मिळविण्याचा अधिकार २००५

## नमुनापत्र - ३

### माहिती मिळविण्याकरीता करावयाच्या अर्जाचा

10रु. कोर्ट फी COURT FEE Rs.10 भारत INDIA दस रुपये TEN RUPEES

प्रति,
शासकिय माहिती अधिकारी,
विधी विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| १) | अर्जदाराचे नाव | :- राजु गोयल (9821535666) |
| २) | पत्ता | :- शॉप न. 04, रश्मी तन्मय "जी" विंग |
| ३) | आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल | :- बेव्हर्ली पार्क, मिरा रोड (पुर्व) |
| (एक) | माहितीचा विषय | :- मौजे भाईंदर सर्वे क्र 485 हिस्सा क्र. 4 याजागेवर कोर्ट ची तपसील मिळणे बाबत |
| (दोन) | माहितीशी संबधित कालावधी | :- आज पर्यंत |
| (तीन) | आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन | :- मौजे भाईंदर सर्वे क्र 485 हिस्सा क्र. 4 याजागेवर ठाणे न्यायालय मध्ये S.C suit No 679/2015 आणी C. Appeal No. 118/2018 केस बाबत सपुर्ण माहिती द्यावी<br>i) याजागेवर बांधकामावर कोर्ट चे आदेश ची सपुर्ण माहिती द्यावी<br>(ii) याजागेवर सद्यस्थितीची माहिती द्यावी विभागीय दस्तावेजनुसार। |
| (चार) | माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तीशः आवश्यक आहे किंवा कसे (प्रत्यक्ष टपाल खर्च अतिरिक्त शुल्कामध्ये समाविष्ट केला जाईल.) | :- स्वत: |
| (पाच) | टपालाद्वारे असेल त्याबाबतीत (सर्वसाधारण, नोंदणीकृत किंवा शीघ्र) | :- स्वत: |
| (सहा) | ज्यासाठी माहिती आवश्यक आहे ते प्रयोजन | :- जानकारीसाठी |

4/11/2019

ठिकाण :- भाईंदर

(signature)
(राजु गोयल)

RIGHT TO INFORMATION

# मिरा भाईंदर महानगरपालिका

जाक्र.मनपा/विधी/मा.अ./०७/२०१९-२०
दि. १३/११/२०१९

प्रति,

श्री. राजू गोयल
शॉप नं. ०४, रश्मी तन्मय "जी" विंग
बेवर्ली पार्क, मिरारोड (पु)

**विषय :-** केंद्र शासनाचा माहिती अधिकार २००५ अन्वये अर्ज.

**संदर्भ :-** आपला दि. ०४/११/२०१९ (प्राप्त दि. ०४/११/२०१९) रोजीचा अर्ज.

**महोदय,**

संदर्भिय माहिती अधिकाराच्या अर्जान्वये आपण मुद्दा क्र. १ व २ नुसार दावा क्र. स्पे. सी. सुट. क्र. ६७९/२०१५ बाबतची माहिती अपेक्षिली आहे. तरी आपणास खालील मुद्यांनुसार माहिती उपलब्ध करुन देत आहे.

**मुद्दा क्र. १ व २ :-** मौजे भाईंदर, सं. क्र. ४८५ जुना, हि. क्र. ४/पै, १०९ नविन, हि. क्र. ४/ब जागेवरील इमारतीच्या बांधकामाबाबत वादी यांनी मा. न्यायालय, ठाणे येथे संदर्भिय दावा दाखल करुन प्रकरण न्यायप्रविष्ठ केले आहे. सदर दाव्यात वादी यांचे असे म्हणणे आहे की, मनपाने सदर जागेवरील इमारतीसाठी दि. २५/६/२०१५ रोजी दिलेली बांधकाम परवानगी रद्द करण्यास तसेच सदर जागेवरील बांधकामावर कारवाई करण्यास मा. न्यायालयाने मनपास अटकाव करावा.

सदर दाव्यात वादी यांनी तात्पुर्ता मनाई हुकुम मिळणेकरीता दाखल केलेला निशाणी क्र. ५ चा अर्ज मा. न्यायालयाने दि. ०२/०३/२०१७ रोजी मान्य करुन दि. २५/६/२०१५ रोजी दिलेल्या बांधकाम परवानगीनुसार वादी यांनी विषयांकित जागेवर केलेल्या बांधकामावर दाव्याचा अंतिम निर्णय लागेपर्यंत कारवाई करण्यास मनपास अटकाव केलेला आहे. सदर आदेशाविरुद्ध मनपाने मा. जिल्हा न्यायालयात अपिल एम. सी. ए. क्र. ११८/२०१८ दाखल केले असता मा. जिल्हा न्यायालयाने दि. १७/४/२०१९ रोजी सदरचे अपिल अंशत: मान्य करुन मा. दिवाणी न्यायालयाने दि. ०२/०३/२०१७ रोजी पारीत केलेल्या आदेशात सुधारणा करुन कायदेशिर तत्वांचा अवलंब केल्याशिवाय मनपास सदर जागेवरील इमारतीवर कारवाई करण्यास दाव्याचा निकाल लागेपर्यंत अटकाव केलेला आहे. (सदर आदेशाची प्रत उपलब्ध करुन देत आहे – एकुण ११ पृष्ठ) त्याअनुशंगाने सदर जागेवरील इमारतीच्या बांधकामाबाबत कायदेशिर तत्वांचा अवलंब करुन पुढील कार्यवाही करण्यास नगररचना विभागास दि. १४/१०/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. सदर पत्राची प्रत उपलब्ध करुन देत आहे. (एकुण ०१ पृष्ठ)

सदरची माहितीकरीता एकुण १२ पृष्ठांकरीता रु. ०२/- प्रमाणे एकुण २४/- चा भरणा करुन सदरची माहिती उपलब्ध करुन घेता येईल.

सदरच्या माहितीने आपले समाधान न झाल्यास आपणास श्री. सुनिल लहाने, मा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मा. उपायुक्त(मु), तिसरा मजला, मुख्य कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे सदरचे पत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांत प्रथम अपिल दाखल करता येईल.

Received Copy 19/11/2019

सई वडके
जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका